# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०११ ११६८
दिनाकः- 14 FEB 2011

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी/
औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नालॉजी
पदवी व पदविका अभ्यासक्रम संस्था तसेच
एमबीए/एमसीए/एमई/एम.फार्म पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम संस्था

विषयः- शैक्षणिक सुधारणा होण्यासाठी संस्थानी औदयोगिक व इतर आस्थापना सोबत सामंजस्य करार करणे बाबत.
संदर्भः- १. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०११/(८१६/११)तांशि-२ दि.२५ जानेवारी २०११
२. प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/२०११/शा२२१ दि.४ फेब्रुवारी २०११

उपरोक्त संदर्भिय विषयानूसार कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ चे परिपत्रक सोबत जोडून पाठवित आहे. त्याचे अवलोकन करावे.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या संस्थेनी दि.३१/१२/२०१० पर्यत काही सामंजस्य करार केले असतील किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेले सर्व सामंजस्य करार या संबंधीची सर्व माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रामध्ये भरुन दि.१८/२/२०१० पूर्वी या कार्यालयास सादर करावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः १. प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यासाठी

**शैक्षणिक सुधारणा होण्यासाठी व्यावसायिक शैक्षणिक संस्था यांनी औद्योगिक व इतर आस्थापनासोबत सामंजस्य करार करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण - २०११/(१६/११)/तांशि-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दि. २५ जानेवारी, २०११**

**परिपत्रक**

गेल्या काही वर्षात व्यावसायिक शिक्षण हे मुख्य आकर्षण ठरले आहे. व्यावसायिक शिक्षण दर्जेदार करण्याच्या अनुषंगाने मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार प्रयत्नशील आहे. त्यातून विविध व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधुन दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जातील विषमता कमी करण्याकरीता महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे.

व्यावसायिक शिक्षण प्रणालीत दर्जेदार सुधार घडवून आणून अतिउत्तम दर्जाचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन व्यावसायिक पदवीधारक निर्माण करण्याचे कार्य आय.आय.टी. व तत्सम संस्था करीत आहेत. परंतु त्यांची संख्या कमी असल्याने मोठया प्रमाणावर शैक्षणिक सुधारणा करणे शक्य होत नाही. या दर्जेदार शैक्षणिक संस्थांचे अनुकरण करुन राज्यातील व्यावसायिक शैक्षणिक संस्था त्यांच्या स्तरावर देशातील व परदेशातील विविध संस्थांशी सामंजस्य करार करुन व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कसे दर्जेदार करता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने खालील बाबींचा विचार करुन शैक्षणिक, औद्योगिक व इतर अस्थापनासोबत सामंजस्य करार करता येण्याची शक्यता सर्व व्यावसायिक शिक्षण संस्थांनी पडताळून पहावी जेणे करुन विविध शैक्षणिक, औद्योगिक देशांतर्गत व देशाबाहेरील अस्थापनांच्या मदतीने शैक्षणिक सुधारणा करणे शक्य होईल.

१. शिक्षकांच्या बौध्दिक क्षमतेचा परिणामकारक वापर करुन औद्योगिक अस्थापनांना सहकार्य करणे ज्यामध्ये औद्योगिक आस्थापनांच्या समस्यांचे समाधान, संयुक्त संशोधन व विकासकार्य, प्रायोजित कन्सल्टनसी कार्य यांचा समावेश असेल.
२. औद्योगिक आस्थापनांच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या उपयोगाचे व अभ्यासक्रमाशी निगडीत दस्ताऐवज, माहिती व लेखसामुग्री प्रकाशित करणे.
३. उद्योजकांसाठी आवश्यक तंत्रज्ञान व कलागुणांचा विकास कार्यक्रम राबविणे.
४. उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन.
५. उद्योजगता मार्गदर्शक शिबिर आयोजन.
६. औद्योगिक आस्थापनांच्या गरजानुसार प्रशिक्षणाचे आयोजन.

७. महाविद्यालयातील ...

मदतीने उपयुक्त वापर करुन प्रशिक्षणाचे आयोजन.

८. औद्योगिक कार्यशाळांचे आयोजन.

९. औद्योगिक आस्थापनांच्या मदतीने उत्कृष्टता केंद्राची स्थापना करणे.

१०. निरंतर शिक्षण योजनेंतर्गत विविध आस्थापनाच्या सहकार्याने प्रशिक्षणांचे आयोजन करणे.

११. देणगी स्वरुपातील मदतीद्वारे अद्यावत प्रयोगशाळा / केंद्रांची स्थापना करणे.

१२. परदेशातील विद्यापिठांच्या सहकार्याने शिक्षण व संशोधन कार्यातील संयुक्त प्रकल्प, विकास व सहकार्य, विद्यार्थी, शिक्षक देवाणघेवाण, प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी.

सद्यस्थितीत ज्या व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी १) परदेशातील विद्यापिठ २) परदेशातील संस्था ३) देशातील औद्योगिक आस्थापना ४) देशातील शासकीय सेस्था व संशोधन केंद्र ५) संस्थेचे भुतपूर्व विद्यार्थी व त्यांची अस्थापना ६) देशातील संस्था यांचे सोबत वर उल्लेखित बाबीसंबधित किंवा इतर बाबीसंबधित सामंज्यस्य करार केला असल्यास त्याची सविस्तर माहिती दहा दिवसाच्या आत संचालनालयास सादर करावी.

ज्या व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी सद्यस्थित वरीलप्रमाणे सहा प्रकारातील संस्थांसोबत सामंज्यस्य करार केला नसेल त्यांनी आपल्या संस्थेतील सर्व शिक्षकांची बैठक घेऊन कृती समितीची स्थापना करावी तसेच कृती आराखडा तयार करुन नजीकच्या काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व शिक्षकांच्या गुणवत्तेत भर पडेल या हेतूने सामंज्यस्य करार करण्यासंबधित कार्यवाही करावी.

**(डॉ. अभय वाघ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण
कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / एम. बी. ए. /एम. सी. ए. / हॉटेल मॅनेजमेंट / वास्तुरचनाशास्त्र महाविद्यालये
प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित / अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / एम. बी. ए. /एम. सी. ए. / वास्तुरचनाशास्त्र महाविद्यालये
प्राचार्य, सर्व विना अनुदानित / अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / एम. बी. ए. /एम. सी. ए. / वास्तुरचनाशास्त्र महाविद्यालये
सर्व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने/औषधनिर्माणशास्त्र संस्था
सर्व विनाअनुदानित तंत्रनिकेतने/औषधनिर्माणशास्त्र संस्था
निवडनस्ती तांशि-२

# प्रपत्र

## शैक्षणिक संस्थानी इतर संस्थांशी केलेल्या सामंज्यस कराराची माहिती.

संस्थेचे नाव :-

| १) परदेशातील विद्यापिठ (Foreign Universities) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्यापिठाचे नाव. | देश | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | | |

| २) परदेशातील संस्था (Foreign Institute) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संस्थेचे नाव. | देश | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | | |

| ३) देशातील औद्योगिक अस्थापना (Indian Industries) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अस्थापनेचे नाव. | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | |

| ४) देशातील शासकीय संस्था व संशोधन केंद्र (Govt. Agencies & Research Laboratories,) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संस्था / संशोधन केंद्रचे नाव. | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | |

| ५) संस्थेचे भुतपूर्व विद्यार्थी व त्यांच्या अस्थापना (Alumnus) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अस्थापनेचे नाव. | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | |

| ६) देशातील संस्था (Institutes in India) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अस्थापनेचे नाव. | कोणत्या क्षेत्रासंबधित करार करण्यात आला. | करार करण्यात आल्याचा दिनांक | कराराचा कालावधी | उपलब्धी |
| | | | | | |

दिनांक :

सही.

पदनाम.